CMYK

कॅन्सरग्रस्त रुग्णाला पंतप्रधान सहायता निधीतून अडीच लाखांची मदत
>> पान 2

रिमझिम पावसातही सलग दुसऱ्या दिवशी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली दुष्काळग्रस्त भागाची पाहणी
>> पान 3

सामाजिक दायित्व निभावणारे व्यक्तिमत्व : मंत्री संजय राठोड
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार
आपल्या मनाचा आवाज ऐका.



हडकुळी आणि रोगट म्हणताच समंथा रुथ प्रभू भडकली; वर्कआऊटचा व्हिडिओ ट्रोलर्सच्या तोंडावर मारला
आतील पान

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 288 ■ सोमवार, दि. 30 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## हिंदी भाषा सक्तीवरील दोन्ही शासन निर्णय मागे घेत नवीन समितीची स्थापना

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : हिंदी भाषा विषय लागू करण्याबाबतच्या निर्णयावर चर्चा करण्यासाठी आज (२९ जून) मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकित हिंदी भाषा सक्तीचा निर्णय मागे घेण्यात आला. बैठकिनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली. तसेच, या संदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येणार असून या समितीच्या अहवालानंतर पुढील निर्णय घेऊ, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.**



पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, ''त्रिभाषा सूत्राच्या संदर्भात तिसरी भाषा कुठल्या वर्गापासून लागू करावी? ती कशा प्रकारे करावी? मुलांना कोणता पर्याय द्यावा? याबाबतचा निर्णय घेण्यासाठी राज्य सरकार डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एका समिति स्थापना करणार आहे. ही समिती तीन महिन्यात अभ्यास करून आपला अहवाल देईल. नरेंद्र जाधव हे कुलगुरू होते, ते नियोजन आयोगाचे सदस्य होते. आपण त्यांना शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखतो. त्यामुळे त्यांच्या नेतृत्त्वात ही स्थापना केली जाईल. यात आणखी काही सदस्य असतील. त्यांचीही नावं लवकरच घोषित केली जातील''

**समितीचा अहवाल आल्यानंतर त्रिभाषा सूत्राचा निर्णय होणार :** तसेच, या समितीचा अहवाल आल्यानंतरच त्रिभाषा सूत्र लागू केलं जाईल. म्हणूनच १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ हे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय आम्ही घेतला,'' असंही मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितलं.

### त्रिभाषा सूत्राचा निर्णय उद्धव ठाकरे यांच्याच नेतृत्वाखाली आणि त्यांच्याच कार्यकाळात - फडणवीस

त्रिभाषा सूत्राचा निर्णय हा तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच घेतला होता आणि त्यांच्याच काळात घेतला गेला, याचा संपूर्ण घटनाक्रम पुराव्यानिशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रपरिषदेत मांडला. त्याचवेळी राज्य सरकारचे १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजीचे दोन्ही शासन आदेश रद्द करत असल्याचे सांगून एकूणच त्रिभाषा सूत्रासंदर्भात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेत एक समिती गठीत करत असल्याची घोषणा केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते.

## पोलिसाने चापट मारली, भाजप नेत्याच्या मुलाने थेट संपवले जीवन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पोलिसांसोबत झालेल्या कथित वादानंतर भाजप नेत्याच्या मुलानं आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रस्त्यावरून जात असताना किरकोळ कारणावरून भाजप नेत्याच्या मुलाचा पोलिसांसोबत वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्यानंतर पोलिसानं तरुणाला चापट मारली. पोलिसानं मारलेली चापट जिव्हारी लागल्याने भाजप नेत्याच्या पुत्रानं टोकाचं पाऊल उचललं आहे. राजकीय पार्श्वभूमी असलेल्या मुलानं अशाप्रकारे आत्महत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. कमल नागरकोटी असं आत्महत्या करणाऱ्या ३१ वर्षीय तरुणाचं नाव आहे. तो नैनितालचे भाजप जिल्हा पदाधिकारी बिशन नागरकोटी यांचा मुलगा आहे. कमल याचा कोटाबाग येथे पोलिसांशी कथित वाद झाला होता. यानंतर त्याने विष प्राशन करून आयुष्य संपवलं. कमल नागरकोटी हा आपले वडील बिशन नागरकोटी यांच्यासोबत व्यावसायात काम करत होता. त्याच्या कुटुंबाने आरोप केला आहे की, त्याने शुक्रवारी कोटाबाग बाजार परिसरात गेला होता. यावेळी नियमित वाहन तपासणीदरम्यान एका हवालदाराने त्याला मारहाण केली आणि अपमानित केले. कमलला काहीही कारण नसताना मारहाण करण्यात आली. तसेच पोलिसाने शिवीगाळ देखील केली. हा अपमान त्याच्या जिव्हारी लागला. ही बाब त्याने लगेचच त्याच्या आईला फोन करून सांगितली. यानंतर विष प्राशन करून जीवन संपवलं,'' असे एका नातेवाईकाने सांगितले.

## इ-ट्रॅक्टर शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणेल

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** पर्यावरण पूरक व पैशाची बचत करणारा इ- ट्रॅक्टर कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणेल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी केले. ते ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात देशातील पहिल्या इ-ट्रॅक्टरची नोंदणी करताना बोलत होते. यावेळी ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिंणी पाटील, इ-ट्रॅक्टर निर्मिती करणाऱ्या ॲटोनेक्स कंपनी चे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ धोंडे व सेल्स मॅनेजर अभिषेक शिंदे हे उपस्थित होते.मंत्री सरनाईक म्हणाले की, सन.२०३० पर्यंत रस्त्यावरील एकूण वाहनांच्या संख्येमध्ये २० ते ३० टक्के वाहने ही विजेवर चालणारी असावीत, असे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने इ-वाहनांना टोल माफी (ए-ींशहळलश्रशी ींश्रश्र षीशश) व खरेदीवर थेट अनुदान देण्याची योजना शासनाने आखली आहे. याचा फायदा इ-ट्रॅक्टर खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांना होणार आहे .तसेच स्वर्गीय अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बिनव्याजी कर्ज देखील इ-ट्रॅक्टर खरेदी साठी त्यांना उपलब्ध होऊ शकते.

## मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंचा पुन्हा एल्गार; आता आर-पारची लढाई

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मैदानात उतरले आहे. यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, आगामी आंदोलन मुंबईतच होणार आहे. हे आंदोलन निर्णायक ठरणार असून, मराठा समाजाच्या विजयाचा गुलाल उधळायचाच आहे, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केलाय. मुंबईतील हे आंदोलन आता फक्त मागणीचं नाही, तर निर्णय घेण्यासाठीचं असेल, असे देखील त्यांनी म्हटले आहे. जालन्यातील अंतरवाली सराटी येथे आज मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी राज्यव्यापी बैठक बोलावली होती. दुपारी बारा वाजता या बैठकीला सुरुवात झाली. बैठकीसाठी राज्यभरातून मराठा कार्यकर्ते अंतरवाली सराटीमध्ये दाखल झाले होते. या बैठकीत मराठा आरक्षणासह गेली दोन वर्षे मराठा समाजाला आंदोलन करून काय मिळालं? आणि आता काय मिळवायचं? या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. तसेच २९ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनाच्या नियोजनाबाबत देखील या बैठकीत चर्चा झाली.

या बैठकीनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला.आपल्याला रणभूमीत उतरायचं आहे आणि विजयही निश्चित मिळवायचा आहे. रणभूमीची तयारी अशी असली पाहिजे की, यावेळी यश आपलंच असणार, असे ठाम शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, आपल्याला कोणीही थांबवू शकत नाही. मैदान आपणच गाजवायचं असून, विजयाचा गुलालही आपल्या अंगावरच उधळला गेला पाहिजे. मागील दोन वर्षांपासून मराठा समाजासाठी आंदोलन सुरू असून, आता ही लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. ही शेवटची लढाई मराठ्यांनी जिद्दीने आणि एकजुटीने पार पाडली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी मराठा बांधवांना केलं.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, २९ ऑगस्टला मुंबईला जायचं आहे. २७ ऑगस्ट रोजी अंतरवालीतून निघायचे आहे. कुठेही न थांबता २८ ऑगस्टला रात्री मुंबईत पोहचायचे आहे. मुंबईतील सर्वच लोकांनी मागे आपली सेवा केली, त्यात परप्रांतीय लोकांनी सुद्धा आपली सेवा केली आहे. पावसाचे दिवस असून मला तुम्ही मुंबईत सोडायला या, पुढचं मी पाहतो. आता अशी संधी पुन्हा मिळणार नसून विजयाची चाहूल लागली आहे, असे त्यांनी म्हटले.

## मोसमी वाऱ्यांनी देश व्यापला; पुढील पाच दिवस पावसाचे



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी रविवारी, २९ जून रोजी संपूर्ण देश व्यापला. साधारणपणे ८ जुलै रोजी मोसमी वारे संपूर्ण देश व्यापतात. यंदा नऊ दिवस अगोदरच मोसमी वाऱ्यांनी संपूर्ण देश व्यापला आहे. देशात सर्वदूर मोसमी पाऊस पडण्यास अनुकूल वातावरण असून, पुढील पाच दिवस देशाच्या बहुतेक भागात चांगला पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजित वेळेनुसार, साधारणपणे ८ जुलै रोजी नैर्ऋत्य मोसमी पाऊस संपूर्ण देश व्यापतात. यंदा नऊ दिवस अगोदर २९ जून रोजीच मोसमी वाऱ्यांनी सर्व देश व्यापला आहे. एक जून रोजी केरळमध्ये दाखल होणारा पाऊस यंदा लवकर २४ मे रोजी दाखल झाला. त्यानंतर २५ मे रोजी मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाला. लगेच दुसऱ्या दिवशी मोसमी वाऱ्यांनी आगेकूच सुरू केली.

मुंबईसह, पुणे आणि इतर काही भागात २६ मेपासून धडक दिली आणि १७ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. यंदा केरळमध्ये वेळेआधीच मोसमी पाऊस दाखल झाला आहे. अंदाजित वेळेपेक्षा ८ दिवस अगोदर आणि मागील १६ वर्षांच्या तुलनेत मोसमी वारे लवकर दाखल झाले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवारी तळकोकणात मोसमी पावसाचे आगमन झाले आणि लगेचच सोमवारी मुंबईत मोसमी पाऊस दाखल झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली. यंदा १५ दिवस अगोदरच मोसमी पाऊस दाखल झाला आहे. सामान्यत: मुंबईत पावसाळा १० जूननंतर सुरू होते. दरम्यान, यंदा मोसमी पाऊस सर्वसाधारण तारखेच्या ९ दिवस आधी निकोबारमध्ये, ८ दिवस आधी केरळमध्ये आणि १३ दिवस आधी महाराष्ट्रात दाखल झाला. एक जूनपासून देशभरात सरासरीपेक्षा ९ टक्के तर, राज्यात १० टक्के जास्त पाऊस झाला आहे.

कोकण, मध्य महाराष्ट्रात मुसळधार

कोकण किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्रात पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडेल. काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विदर्भात पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. मराठवाड्यात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे, असा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

## जगन्नाथ रथयात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी मोठी कारवाई; पुरी डीएमसह एसपींची बदली तर डीसीपी निलंबित

**मुंबई/प्रतिनिधी :** पुरी रथयात्रेतील चेंगराचेंगरीनंतर राज्य सरकारने मोठा निर्णय घेत पुरीचे जिल्हाधिकारी आणि एसपी यांची बदली केली आहे. याशिवाय कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल डीसीपी विष्णू पती आणि कमांडंट अजय पाधी यांना निलंबित करण्यात आले आहे. दरम्यान, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी प्रत्येक मृत भाविकाच्या कुटुंबियांना २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तर मुख्यमंत्र्यांनी विकास आयुक्तांच्या देखरेखीखाली सविस्तर प्रशासकीय चौकशीचे आदेश दिले आहेत आणि जिल्हाधिकारी आणि एसपींची बदली करण्याचे निर्देश दिले आहेत. दुसरीकडे चंचल राणा यांची नवीन जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर पिनाक मिश्रा यांनी नवीन एसपी म्हणून पदभार स्वीकारला आहे.

## माय मराठीसाठी आझाद मैदानातून लढ्याचे रणशिंग फुंकले

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात पहिलीपासून सक्तीच्या हिंदीकरणाविरोधात (२९ जून) आझाद मैदानातून रणशिंग फुंकण्यात आले. शिवसेना ठाकरे गटाकडून आझाद मैदानात महायुती सरकारने काढलेल्या हिंदी सक्तीच्या आदेशाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत प्रतिकात्मक होळी करण्यात आली. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मनसे नेते नितीन सरदेसाई, आमदार आदित्य ठाकरे, शिवसेना खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई, सुभाष देसाई, संतोष शिंदे, अभिनेता हेमंत ढोमे, काँग्रेस प्रवक्ते युवराज मोहिते सुद्धा उपस्थित होते. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी सगळेच गुलाम झाले नसल्याची प्रतिक्रिया दिली. मराठी अभ्यास केंद्र आणि समविचारी संस्था यांच्या वतीनेही सक्तीच्या आदेशाची होळी करण्यात आली.**

### हिंदी सक्तीच्या आदेशाची होळी करताच उद्धव ठाकरेंची भीमगर्जना

५ जुलैचा महा भव्य मोर्चा असेल

उद्धव ठाकरे यांनी पाच जुलै रोजी निघणारा मोर्चा हा महा भव्य मोर्चा असेल असे सांगितले. दरम्यान, मोर्चा काढण्याची वेळ येऊ दिली जाणार नाही असा आम्ही या संदर्भात प्रयत्न करत असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली होती. या संदर्भात विचारण्यात आला असता उद्धव ठाकरे म्हणाले की, सगळेच गुलाम झाले नाहीत ही चांगली गोष्ट आहे. मात्र, कोणाचा दुराग्रह आहे हे कोण हे कोणी सांगत नसल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. पाच जुलै रोजी होणारा मोर्चा हा महा भव्य मोर्चा असेल असे त्यांनी नमूद केलं. त्यांनी सांगितले की जीआरची होळी केली आहे याचा अर्थ जो लागू आहे असे आम्ही मानत नाही.

राज्यभरात प्रतिकात्मक आंदोलन

आझाद मैदानात उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीतून हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करण्यात आली त्याच पद्धतीने राज्यभर सुद्धा हिंदी सक्तीच्या शासन आदेशाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. यावेळी हिंदीला विरोध नसल्याचे सांगत सक्तीला विरोध असल्याची प्रतिक्रिया आंदोलकांनी दिली. नाशिक, पुण्यासह मुंबईमध्ये सक्तीच्या हिंदीविरोधात आंदोलन करण्यात आले. दुसरीकडे, याला विरोध म्हणून भाजपकडून प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले. मुंबईत भाजप आमदार राम कदम यांनी ठाकरेंच्या शिवसेनेविरोधात आंदोलन केले.



CMYK

## वाढती बालगुन्हेगारी; धोक्याची घंटा

क्रिकेट खेळण्याच्या किरकोळ वादातून आठवीतील विद्यार्थ्याने नववीतील विद्यार्थ्याचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर शहरातील नामांकित शाळेत घडली. या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. गेल्याच वर्षी शाळेची बॅग फाडली या कारणामुळे एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना पुण्यात घडली होती. दोन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. तीनवर्षापूर्वी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ – २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात एकावर्षात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण अहिल्यानगर मधील या व आधीच्या घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. वर उल्लेख केलेल्या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे मुले त्या त्या शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत. भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि शिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा रहास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

# कॅन्सरग्रस्त रुग्णाला पंतप्रधान सहायता निधीतून अडीच लाखांची मदत

## जीवनात संजीवनी ठरले खासदार संजय देशमुख यांचे सहकार्य

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ मारेगाव :** कॅन्सर ग्रस्त रुग्णाला खासदार संजय देशमुख यांनी पंतप्रधान सहायता निधीतून आर्थिक मदत करून रुग्णाच्या चेहऱ्यावर हास्य फुलवीत आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. खासदार देशमुख हे गोरगरिबांचे कैवारी, अडल्या नाडल्यांच्या मदतीला धावून जाणारे व्यक्तिमत्व ओळखले जात असून त्यांच्या या सामाजिक दायित्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

येथील देवसिंग महादेव कोवे या गरीब कुटुंबातील व्यक्तीला कॅन्सरचा गंभीर आजार झाल्याने पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा सल्ला दिला आणि उपचारासाठी तब्बल पाच लाख रुपयांची गरज भासू लागली. मात्र, कोवे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने एवढी रक्कम उभी करणे कुटुंबासाठी अशक्यप्राय ठरू लागले. कुटुंबात चिंतेचं वातावरण निर्माण झाले. अशा कठीण प्रसंगी कोवे यांचे नातेवाईक व सामाजिक कार्यकर्ते अभय चौधरी यांनी खासदार संजय देशमुख यांची भेट घेऊन कोवे यांच्या शस्त्रक्रियेसाठी मदत करण्याची विनंती केली असता, सामाजिक भान असलेले, संकटग्रस्तांना नेहमी मदतीचा हात देणारे खासदार संजय देशमुख यांनी या विनंतीला तात्काळ प्रतिसाद दिला. त्यांनी स्वीय सहायक गजानन कदम यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून पंतप्रधान वैद्यकीय सहायता निधीसाठी प्रस्ताव त्वरीत पाठवण्याचे निर्देश दिले. गजानन कदम यांनी कोणतीही दिरंगाई न करता आवश्यक कागदपत्रे गोळा करून सातत्याने पाठपुरावा करत, दिल्लीपर्यंत पोहोचवले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे पंतप्रधान सहायता निधीतून अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. मंजुरी पत्र मिळताच कोवे कुटुंबीयांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. आज संजय देशमुख यांच्या मदतीमुळे कोवे यांच्यावर योग्य उपचार होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, एका गरीब रुग्णाला जीवदान मिळाले आहे. यावरून खासदार संजय देशमुख यांच्या लोकसेवेच्या संवेदनशील आणि प्रभावी नेतृत्वाचे जिवंत उदाहरण ठरले आहे. खासदार संजय देशमुख यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# न प क्षेत्रातील जगा नियमाकुल होण्याचा मार्ग मोकळा; भारत गुंजकर यांच्या प्रयत्नाला अखेर यश



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** :नगरपरिषद हद्दीतील शासकीय जागा ह्या नियमाकुल करून संबंधित लोकांच्या स्वाधीन करावे आहे यासाठी भारत गुंजकर यांनी अनेक दिवसापासून प्रयत्न केले होते अखेर त्यांच्या प्रेरणाला यश आले असून इंदिरानगर ,रामनगर, गौसपुरा ,जिजाऊ नगर, माणुसकी नगर ,येथील शासकीय जागेवर राहणारे नागरिक हे शासकीय योजनेपासून वंचित होते कारण ह्या जागा नियमाकुल नव्हत्या यासाठी गेल्या अनेक दिवसापासून गुंजकर हे सातत्याने उपोषण आंदोलन करुन प्रयत्न करीत होते त्यांच्या या पाठपुराव्याला खेळ यश आले आहे नगर परिषदेने जागा नियमाकुल संदर्भात मोजणीसाठी शासकीय फी भरली असून लवकरच आता या भागातील नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळणार आहे जागा नियमाकुल करण्या संदर्भात भूमी अभिलेख कार्यालयात फी भरल्यानंतर या संदर्भात हालचालींना वेग आला आहे त्यामुळे या भागातील नागरिकांना हक्काची घरे मिळणार असून लवकरच या भागातील नागरिक शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार आहे.

# गोमांस विक्री प्रकरणी एका विरुद्ध गुन्हा; गोमांसह इतर साहित्य जप्त : गोहगाव दांदडे येथील घटना

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गोहगाव दांदडे येथे गोमांस विक्री प्रकरणी एका आरोपी विरुद्ध डोणगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी शेख शेफिफ शेख हसन याच्याविरुद्ध विविध कलमान्वये पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्याच्याजवळ गोमांस इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार गोगाव दांदडे येथील कुणाल राजेश मापारी यांनी डोणगाव पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, मी गोहगाव दांदडे येथील बजरंग दल शाखेमध्ये सदस्य असून गौरक्षणाचे काम पाहतो. गावातील एका व्यक्तीने होणारी माहिती दिली की गावात एक माणूस बसस्थानकाजवळ गोमांस विकत आहे. सदर माहितीवरून गणेश डुकरे, गोपाल गजानन काळे, रंजीत कणकटाव, राहेन दांदडे सुमीत काळे, नितीन कड असे आम्ही मटन विकत असलेल्या मानसाजवळ जावुन पाहिले असता तो मटण विकतांना दिसला. आम्ही त्या मटणाची पाहणी केली असता ते मांस गोमांस असल्याचा आम्हाला संशय आला. मटण विकणाऱ्याला नाव विचारले असता त्याने डोणगाव येथील आहे असे म्हणून उडवा उडवी चे उत्तर दिले. सदर घटनेबाबत डोणगाव पोलीस स्टेशनला माहिती दिली असता डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनी नागरे, पोका पवन गाभने यांनी गोहगाव येथे येऊन घटनास्थळाची पाहणी केली व दोन पंच बोलवुन आरोपीचे नाव गाव विचारले असता त्याने शेख शफिफ शेख हसन वय २७ या. रहेमत नगर वार्ड क्रमांक १ डोणगाव ता.मेहकर असे सागितले. त्याचे ताब्यात असलेले गोमांसाची पंचासमक्ष पाहणी करून त्याचे वजन केले असता ते २ किलो ६०० ग्रम भरले असून प्रति किलो २०० कि प्रमाने एकूण ५२० रुपये किमतीचे गोमांस मटन व एक नायलॉन थैली कि ३० रुपये अशा एकूण ५५० रुपयांचा मुद्देमाल दोन पंचा समक्ष जप्त केला. पोलिसांनी गोमास विक्री प्रकरणी आरोपी शेख शफिफ शेख हसन याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेच्या पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी केली नुकसान ग्रस्त भागाची पाहणी



दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे

**महारचिकना:** लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळातील महार चिकना, खापरखेड, सोमठाणा, खळेगाव, कारेगाव, अंजनी खुर्द सिंदखेडराजा तालुक्यातील कोनाटी कुंबेफळ देऊळगाव कोळ सह अनेक गावांत ढगफुटी सदृश्य पावसामुळे बऱ्याच शेतकरी बांधवांचे शेतीपिकाचे नुकसान झाले सदर शेतकर्याचे नुकसानीची पाहणी माजी मंत्री तथा सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनी तलाठी दादाराव साळवे तलाठी डोईफोडे यांचे सह शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पाहणी केली यावेळी त्यांचें सोबत माजी सरपंच प्रकाश नागरे,विनोद ताकतोडे, सुभाष पाटील ढाकणे, गजेंद्र नागरे, सचिन सानप गणेश ढाकणे, शिवानंद कायंदेसह शेकडो शेतकरी उपस्थित होते

## हडकुळी आणि रोगट म्हणताच समंथा रुथ प्रभू भडकली; वर्कआऊटचा व्हिडिओ ट्रोलर्सच्या तोंडावर मारला

**मुंबई/प्रतिनिधी :** दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री समंथा रुथ प्रभू हिला मागील काही दिवसांपासून तिच्या लूकमुळे सोशल मीडियावर ट्रोल केलं जात आहे. खरं तर, तिच्या ट्रान्सफॉर्मेशनमुळे काही युजर्स नाराज आहेत. समंथा रुथ प्रभूच्या चाहत्यांना ती 'खूपच बारीक' किंवा 'आजारी' दिसत असल्याचं वाटत आहे. यावर आता सामंथाने स्वतःचा एक व्हिडिओ शेअर करत ट्रोल करणाऱ्यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं. या व्हिडिओमध्ये ती वर्कआउट करताना दिसते.

सामंथा रुथ प्रभुचं ट्रोलर्सना प्रत्युत्तर

सामंथाने काल आपल्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडिओ शेअर केला, ज्यामध्ये ती व्यायाम करताना दिसत आहे. व्हिडिओ शेअर करत तिने लिहिलं, ''मुद्दा हा आहे तुम्ही मला बारीक, आजारी किंवा काहीही म्हणू शकत नाही, जोपर्यंत तुम्ही स्वतः मी करत आहे, तो व्यायाम करुन दाखवत नाहीत.'' समंथाचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे आणि चाहते तिचं भरभरून कौतुक करत आहेत.

# वस्त्रोद्योग महामंडळाचे माजी अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी केली नुकसान ग्रस्त भागाची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे

**महारचिकना :** लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळातील महार चिकना, ब्राह्मण चिकना, खापरखेड, सोमठाणा, खळेगाव, कारेगाव, अंजनी खुर्द, वडगाव तेजन सिंदखेडराजा तालुक्यातील कोनाटी कुंबेफळ देऊळगाव कोळ सह अनेक गावांत ढगफुटी सदृश्य पावसामुळे बऱ्याच शेतकरी बांधवांचे शेतीपिकाचे नुकसान झाले सदर शेतकर्याचे नुकसानीची पाहणी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन केली तसेच वस्त्रोद्योग महामंडळाचे माजी अध्यक्ष रविकांत तुपकर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या रखडलेल्या जमिनीची पाहणी केली व नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना जोवर जास्तीतजास्त नुकसानभरपाई भेटत नाही तोवर शांत बसणार नाही असे सांगितले संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सुद्धा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे करण्यासाठी सपंर्क केला असता लवकरच पंचनामे करण्याचे आश्वासन त्यांना दिले यावेळी त्यांचें सोबत शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड सुभाष पाटील ढाकणे, प्रकाश




नागरे उद्धव नागरे गजानन घुगे , सुनिल सोनुने,किरण नागरे विजय ढाकणे विश्वास मुंढे भगवान घुले यांचेसह महार चिकना खापरखेड येथील बरेच शेतकरी उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# रिमझिम पावसातही सलग दुसऱ्या दिवशी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली दुष्काळग्रस्त भागाची पाहणी

## बांधावर जाऊन दिला शेतकऱ्यांना धीर







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर रिमझिम पावसातही केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज सलग दुसऱ्या दिवशी मेहकर तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित झालेल्या क्षेत्रांची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला.

२६ जून रोजी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार आणि मेहकर तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने या दोन्ही तालुक्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले जमिनी खरडून गेल्यात या संदर्भाची माहिती मिळाल्यानंतर केंद्रीय मंत्री भूमिपुत्र प्रतापराव जाधव हे २७ ला दिल्लीवरून आल्यानंतर २८ जून रोजी त्यांनी लोणार आणि मेहकर तालुक्यातील तालुक्याचा दौरा केला नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली सलग दुसऱ्या दिवशी २९ जूनला रिमझिम पाऊस असतानाही भर पावसात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मेहकर तालुक्यातील फर्दापुर, कंबरखेड, गौंढाळा, भालेगाव, पाचला, रायपुर, सावत्रा, नायगांव दत्तापुर, मोसंबेवाडी, उटी, वरवंड, देऊळगांव साकर्षा या सर्व क्षेत्रात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली शेतकऱ्यांसोबत संवाद साधून त्यांना धीर दिला. शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली व प्रशासनालाही तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश दिले

## संक्षिप्त...

### नेतंसा येथे वादळी वाऱ्याने सोलर पॅनलचे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड तालुक्यांमध्ये सतत धार पाऊस आणि वादळी वाऱ्याने शेती पिकाचे अतोनात नुकसान झाले यामध्ये नावली नेतांसा येथे सोलर पॅनलचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून यामध्ये साहेबराव बळीराम बाजड ५ .सोलर संतोष साहेबराव बाजड ५ सोलर सौ रुपाली संतोष बाजड ३ सोलर या शेतकऱ्यांचे केळी हळद सर्व महापुरात वाहून गेलेआहे या सोबत ३ एकरची साहेबराव बळीराम बाजड यांची ठिबक शिंचन एक बोअर पूर्णताह गाळलेला आहे आ सौ रुपाली संतोष बाजड यांच्या केळीचे चार महिन्याचे रोपे २ एकरची ठिबक सिंचन व पाईप तुषार सिंचन सेट पुरामुळे सांतोष साहेबराव बाजड यांचा २ एकर हळद त्या सोबत ठिबक सिंचन व पाईप असे या सर्व शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तरी झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे



### घरकुल लाभार्थी निधीच्या प्रतीक्षेत.

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ :** विविध योजनेमार्फत अनेक नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात येत आहे. परंतु निधी उपलब्ध नसल्याने घरकुल लाभार्थ्याचे दिग्रस पंचायत समिती परिसरात भटकंती सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही लाभार्थ्यांची अर्धवट घरे बांधकाम असल्याचे चित्र दिसत आहे तर काहींनी कर्जबाजारी होऊन आपले घर पूर्ण केले परंतु शासनाकडून योग्य वेळेवर निधी लाभार्थ्यापर्यंत पोहोचत नसल्याने घरकुल लाभार्थ्याकडून असमाधान व्यक्त होत आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे सर्वसामान्य लाभार्थी कचा टयात सापडला असल्याचे चित्र दिसून येत आहे. वेळेवर घरकुल चे पैसे शासनाकडून मिळत नसल्याने घरकुल लाभार्थी मोठ्या अडचणीत आला आहे. तसेच अनेक गरजू विधवा अपंग व भूमीहिन व शेतमजूर घरकुल लाभापासून वंचित असल्याचे सुद्धा चित्र दिसून येत आहे. सध्या परिस्थिती पावसाचे दिवस असल्याने गावागावात पेरणीची धामधूस सुरू असून अनेक लोकांना आपल्या शेतात कामे सोडून तालुक्याच्या ठिकाणी घरकुलच्या निधीसाठी चकरा मारायच्या की शेतात जायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. घरकुलाच्या नाममात्र पैशात पूर्ण घरकुल होणे शक्य नसले तरीसुद्धा आधार म्हणून घरकुलचे पैसे लवकरात लवकर मिळावे अशा अपेक्षेणी लोकांनी आपले राहते घर खोलुन भरपावसात सध्या परिस्थितीत अर्धवट घर बांधकाम असल्याने आपला संसार उघड्यावर आनला आहे. तरी शासन दरबारी लवकरात लवकर घरकुल योजनेचे पैसे द्या अशा सुरात अनेक घरकुल लाभार्थी निधीच्या प्रत्यक्ष ओढ लावून बसले आहे. तरी शासन प्रशासनाने या गंभीर समस्येची दखल घेऊन त्वरित घरकुल लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून लवकरात लवकर न्याय प्रदान करावे विनवणी शासन दरबारी अनेक नागरिक करत आहे.

## महिला स्वच्छता गृह उभारण्यासाठी युवकाचे अनोखे आंदोलन; प्रशासनाचे काढले वाबळे

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** गावाची तब्बल ३५ हजारांवर लोकसंख्या आहे. मात्र, शहरात महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छता गृह नसल्याने महिलांची कुचंबना होत आहे. त्याचबरोबर डोणगावला परिसरातील ३२ खेड्यांची बाजारपेठ जोडलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी दररोज हजारो महिलांची विविध कामानिमित्त येजा असते.मात्र, शहरात सार्वजनिक शौचालय नसताना प्रशासन केवळ बघायची भूमिका घेत असल्याने संतप्त झालेल्या एका छाव्याने हातात निषेध बोर्ड घेत अनोखी आंदोलन केले आहे. त्यामुळे डोणगाव येथील महिलांच्या सार्वजनिक स्वच्छतागृहाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहाची व्यवस्था व्यवस्थित नसल्याने शासन प्रशासनाप्रती मात्र, सर्वसामान्यांमध्ये रोष व्यक्त केला जात आहे. डोणगाव येथे महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह व्यवस्था दयनीय नसल्याने व जे आहे.त्याचीही अत्यंत दुरावस्था झाल्याने एका युवकांनी या संदर्भात अनोखे आंदोलन केले. मंत्र्यांच्या बायका, मुलींसाठी एसी सुलभ शौचालय निर्माण केलेत. मात्र, जिल्ह्यातील महिलांसाठी सुलभ शौचालय नसल्याने संतापलेल्या युवकांनी बस स्थानकावर निषेध व्यक्त केला. अंकुश दिलीपराव मेटांगळे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. डोणगाव ग्रामपंचायत ही सर्वात मोठी ग्रामपंचायत असुन तसेच दर बुधवारी येथे आठवडी बाजार भरतो. बस स्टँड परिसरात मालेगाव, वाशीम अकोला, रिसोड मेहकर येथे नेहमी वर्दळ असते. परंतु महिला वर्गांना लघुशंकेसाठी स्वच्छतागृह नसल्यामुळे बस स्टॅन्ड व आठवडी बाजार लघुशंकेसाठी मुत्रीघर आहे. परंतु, घाण रस्ता असल्याने जाणे शक्य होत नाही. परिणामी महिला वर्गाची कुचंबना होत आहे. या संदर्भात अंकुश मेटांगळे या युवकांनी आक्रमक पवित्रा घेत हाती बोर्ड घेत डोणगाव येथील महिलांच्या स्वच्छतागृहाचा प्रश्न उपस्थित करीत अनोखे आंदोलन केले. या आंदोलनाला आजुबाजुला उपस्थित असलेल्या प्रवाशांनी पाठिंबा देत तात्काळ स्वच्छतागृह सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याची मागणी केली. यासाठी लोकप्रतिनिधींनी ही पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा प्रवाशांनी व्यक्त केली.




## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "मन की बात" मध्ये जुन्नरच्या रमेश खरमाळे आणि पाटोदा ग्रामपंचायतीच्या कामाचा केला गौरव

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २९ जून रोजी झालेल्या 'मन की बात' कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील रमेश खरमाळे आणि छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पाटोदा ग्राम पंचायतीने केलेल्या पर्यावरण रक्षणाच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, या महिन्यात आपण जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अनेक उपक्रम केले. अनेकांनी आपल्या परिसरातील पर्यावरण रक्षणासाठी एकट्याने प्रयत्न करणाऱ्या लोकांची माहिती दिली. पुणे जिल्ह्यातील रमेश खरमाळे यांनी पर्यावरण रक्षणासंदर्भात केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. आठवड्याच्या अखेरीस जेव्हा बहुतेक लोकं घरी बसून आराम करणे पसंत करत असतात तेव्हा रमेश खरमाळे आणि त्यांचे कुटुंबीय कुदळ, फावडे घेऊन घराबाहेर पडतात. खरमाळे कुटुंबीय जुन्नर परिसरातील डोंगरांमध्ये जातात आणि जमिनीत पाणी मुरवण्यासाठी चर खणतात, बिया लावतात. फक्त २ महिन्यांमध्ये त्यांनी ७० चर खणले आहेत. खरमाळे यांनी अनेक लहान लहान तळी तयार केली आहेत, शेकडो झाडे लावली आहेत. श्री. खरमाळे हे एक ऑक्सिजन पार्क देखील उभारत आहेत. या सगळ्याचा परिणाम असा झाला की या भागात पक्षी परतू लागले आहेत. वन्यजीवनाला नवीन आयुष्य लाभले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'पाटोदा' ही कार्बन मुक्त ( कार्बन न्यूट्रल ) ग्रामपंचायत आहे. या गावात कोणीही स्वतःच्या घराबाहेर कचरा फेकत नाही. प्रत्येक घरातून कचरा संकलित करण्याची चोख व्यवस्था केलेली आहे. या गावात सांडपाण्यावर प्रक्रियाही करण्यात येते. प्रक्रिया करून स्वच्छ केल्याशिवाय पाणी नदीत सोडले जात नाही. या गावात गोवऱ्या वापरून मृतांवर अंत्यसंस्कार करण्यात येतात. या गोवऱ्यांची राख वापरून दिवंगत व्यक्तीच्या नावे झाड लावले जाते. या गावात स्वच्छता राखण्यासाठी सुरु असलेले उपक्रम अनुकरणीय आहेत. नागरिकांच्या लहान लहान सवयी जेव्हा सामुहिक निर्धाराचे रूप घेतात तेव्हा फार मोठे परिवर्तन आपोआप घडून येते, अशा शब्दांत पंतप्रधानांनी पाटोदा ग्राम पंचायतीच्या कामाचा गौरव केला.



## 'चल काम देतो' म्हणत मुलीची २ लाखांत विक्री

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव शहरातील हरी विठ्ठल नगर परिसरात संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. इथं एका अल्पवयीन मुलीला काम देण्याच्या बहाण्याने तिची विक्री केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपी एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी तिचं कोल्हापुरात एका व्यक्तीसोबत लग्न लावून तिचं लैंगिक शोषण केलं आहे. यातून ती गर्भवती राहिल्यानंतर आरोपींनी तिचा गर्भपात देखील केला आहे. हा सगळा प्रकार पीडितेच्या वडिलांना समजल्यानंतर त्यांनी आत्महत्या केली आहे. भैया रामदास पाटील (वय ४१) असं आत्महत्या केलेल्या पित्याचं नाव आहे. त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आपल्या अल्पवयीन मुलीला कामाच्या बहाण्याने फसवून नेऊन विकले गेले आणि तिचे जबरदस्तीने लग्न लावले. या धक्क्यातून त्यांनी हे टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव शहरातील काही महिलांनी पीडित मुलीला नोकरीच्या बहाण्याने नाशिकला घेऊन गेले होते. मात्र, तिला कोल्हापूर येथे एका व्यक्तीला दोन लाख रुपयांत विकले. एवढंच नव्हे तर आरोपी महिलांनी तिचं बळजबरीने लग्न लावून दिलं. जानेवारी २०२५ मध्ये कोल्हापूर इथं लग्न झाल्यानंतर मे महिन्यात तिचा गर्भपातही करण्यात आला.

## आईच्या भेटीसाठी चिमुकलीचा टाहो; आठ दिवसांपासून चिमुकलीला भेटीची आस

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**मेहकर :** नातेवाईकांच्या भेटीसाठी गेलेली आई परत न आल्याने सात वर्षीय चिमुकली गत आठ दिवसांपासून टाहो फोडत आहे. दररोज आई कधी येणार अशी विचारणा करीत चिमुकल्या मयुरीने आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली आहे. आईचा कधी येणार याबाबत आजुबाजुला विचारणा करीत चिमुकली मयुरी आईच्या भेटीसाठी आसुसली आहे .चिमुकलीचे हा टाहो पाहून आजुबाजुच्या महिलांसह नागरिकांचे डोळे पानावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. चिमुकली मयुरी ही आई कधी येणार याबाबत प्रत्येकाला प्रश्न करीत असल्याने येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती भावनिक होऊन डोळे अश्रूंनी भरून येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तालुक्यातील बेलगाव येथे ४२ वर्षे महिला वंदना अशोक साबळे गावातील काही लोकांसोबत वाशीम येथे आजारी नातेवाईकाला भेटायला जाते असे सांगून २२ जून रोजी घरून गेली होती.

मात्र ती परत न आल्याने सात वर्षीय मुलगी आणि पंधरा वर्षे मुलगा टाहो फोडत ज्यांच्या सोबत आई गेली. त्यांच्या घरी चकरा मारत असून माझी आई कुठे आहे. तुम्ही आले, आई कधी येणार अशी विचारणा करीत आहेत.मात्र, दोन दिवसांपासून तेही गावातून गायब झाले आहेत. त्यामुळे चिमुकल्याने एकच टाहो फोडला असून या संदर्भात महिलेच्या पतीने डोणगाव पोलीस स्टेशनला तक्रार देऊन माहितीचा शोध घेण्याची विनंती पोलिसांना केली आहे. बेलगाव येथील वंदना अशोक साबळे वय ४२ वर्ष ही महिला २२ जून रोजी घरी असताना तिला बोलवण्यासाठी गावात राहत असलेली रंजना संजय इंगळे ही महिला तिच्या घरी आली व तिला कोणीतरी नातेवाईक हे वाशीम येथे आजारी आहेत.त्यांना पाहण्यासाठी जायचे म्हणून वंदना साबळे इला सोबत घेतले.सात वषीय मुलगी मयुरी व पंधरा वर्षीय पंकज साबळे आईला कधी परत येणार असे प्रत्येकाला विचारत आहेत. गावातीलच संजय इंगळे, मीना लक्ष्मण गिरे या महिला सोबत वंदना गेली. त्या महिला परत आल्या.परंतु, वंदना परत आली नाही. त्यामुळे संशयाचे काहूर मनामध्ये उठत आहेत. गत आठ दिवसापासून आईचा विरह असह्य झाल्याने सात वर्षीय चिमुकली टाहो फोडत आई परत येण्याच्या वाटेकडे टक लावून बसली आहे.





## आमदार भावनाताई गवळी शेतकऱ्यांच्या बांधावर शेतकऱ्याना सर्वोपारी मदत करण्याचे आश्वासन

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** २५ व २६ जून रोजी धुवाधार झालेल्या पावसामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या आहेत तर काही शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट कोसळले आहे काल दिनांक २८ जून रोजी आमदार भावनाताई गवळी यांनी किनखेडा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली व शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची आश्वासन दिले.

खरिपाच्या पेरण्या पूर्ण होण्याआधीच २५ व २६ जून रोजी तालुक्यासह जिल्ह्यात अतिवृष्टी झाली या अतिवृष्टीमुळे नदीकाठच्या व सखल भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले नुकतीच पेरणी केलेली शेती खरडून गेली काही शेती उपयोगी साहित्य ही वाहून गेले किनखेडा येथील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून नदी काठालगत असलेल्या शेतीचे पुरामुळे प्रचंड नुकसान झाले आहे काल दिनांक २८ जून रोजी आमदार भावनाताई गवळी यांनी नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला यावेळी त्यांनी किनखेडा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली शसनाकडून सर्वोपारी मदत करण्याचे आश्वासन दिले यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना जिल्हा संघटक अनिल गरकळ किनखेडे येथील येथील शेतकरी गजानन गिरी, सुधाकर अंभोरे, माणिक अवचार दिलीप अवचार, धोंडाबा अवचार तंटामुक्ती तंटामुक्ती अध्यक्ष पंजाबराव अवचार, सर्कल प्रमुख सतीश अवचार यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सामाजिक दायित्व निभावणारे व्यक्तिमत्व : मंत्री संजय राठोड

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ :** शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या बंजारा समाज बांधवाची शैक्षणिक प्रगती व्हावी,समाजातील प्रत्येक व्यक्ती शिकून मोठा व्हावा, पारंपारिक संस्कृती जोपासत आधुनिकतेची कास धरावी, यासाठी जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी बंजारा समाजाला धर्मगुरू संत रामराव महाराज यांच्या पावन भूमीत एकत्र करत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक वर्षापासून पुढाकार घेतला आहे. त्यामुळे संजय राठोड हे बंजारा समाजातील सामाजिक दायित्व निभवणारे व्यक्तिमत म्हणून ओळखले जात आहेत.

त्यांचा बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी, उमरी खुर्द या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यातही मोलाचा वाटा आहे. बंजारा समाज हा भटका समाज असल्याने या समाजाची अपेक्षित शैक्षणिक प्रगती झाली नाही. समाजामध्ये रूढी, परंपरा व अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात होत्या. त्यामुळे बंजारा समाजाची प्रगती खुंटली होती.बंजारा समाजाचे धर्मगुरू संत रामराव महाराज यांनी बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण आयुष्य खर्च केले. त्यामुळे समाजामध्ये अमुलाग्र बदल घडून आला.

समाजातील प्रत्येक व्यक्ती हा शैक्षणिक शिक्षणाला महत्त्व देऊन उच्चशिक्षित झाला. विविध पदावर विराजमान झाला. धर्मगुरू संत रामराव महाराज यांचे कार्य हे समाजाला दिशा देणारे ठरले.संत रामराव महाराज यांच्या कार्यालय प्रभावित होत. मंत्री संजय राठोड यांनी समाजाच्या प्रगतीसाठी पुढाकार घेत मोठा बदल घडवून आणला आहे. बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी येथे भव्य नंगारा वास्तू उभारून समाजाच्या रूढी, परंपरा व संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. मंत्री संजय राठोड यांच्या पुढाकारातून पोहरादेवीचा कायापालट झाला असून त्या ठिकाणी मोठा बदल झाला आहे. त्यामुळे संजय राठोड हे बंजारा समाजातील एक आदराचे स्थान निर्माण झाले असून सामाजिक दायित्व निभावणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जात आहे.
















